# वसई विरार शहर महानगरपालिका
## महिला व बालकल्याण विभाग, मुख्यालय

जा.क्र :- वविशम/म.बा.क.स/७१ /२४-२५
दिनांक :- 23 /07 /२०२४

<u>जाहिर दरपत्रक</u>

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत अनाथ आश्रम, दिव्यांग व विशेष मुलांच्या शाळा यामधील बालकांकरीता बालमेळावे आयोजित करावयाचे असून सदर काम करण्यास इच्छुक एजन्सी यांनी त्यांच्या लेटरपॅडवर खालील उल्लेख केलेल्या कामांच्या बाबींचे दर (सर्व करासहीत) दि. २९/०७/ २०२४ रोजी दुपारी 3:00 वा. पर्यत बंद लिफाफ्यातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, विरार (पूर्व) आवक बारनिशीकडे सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशिल | प्रति बालमेळावा दर (रुपये) (सर्व करासहीत) | |
|---|---|---|---|
| | | अंकात | अक्षरात |
| १ | महानगरपालिका हद्दीतील अनाथ आश्रम, दिव्यांग व विशेष मुलांच्या शाळा यामधील बालकांकरीता बालमेळाव्याचे आयोजन करणे बाबत.<br>(मॅजीक शो,डान्स खेळ,स्पॉट गेम, बक्षीस,विविधस्पर्धा,खाऊ,पाणी,बॅनर,साऊंड सिस्टीम) | | |

### :- अटी-शर्ती :-

१) दरपत्रक हे संस्थेच्या लेटरपॅडवर सादर करणे.
२) मालकाचे / संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व GST नोंदणी प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
३) संस्था नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.
४) संस्थेने मुलांसाठी कार्यक्रम घेतल्याबाबतचा किमान एक (१) पुरावा.
५) दरपत्रकासोबत कामाच्या एकूण रकमेच्या १ टक्का इसारा रक्कम (उदा.१० लक्ष रकमेच्या १ टक्का रक्कम रु.१० हजार ) डी.डी स्वरुपात वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नावाने तांत्रिक बाबीच्या लिफाफ्यामध्ये सादर करण्यात यावा.
६) दरपत्रकात नमूद कामाचे दर हे सर्व करासहीत भरणेचे आहेत.
७) महानगरपालिके कडून देण्यात येणाऱ्या अनाथ अश्राम,दिव्यांग व विशेष मुलांच्या शाळेंच्या यादीनुसार व्याख्याने आयोजित करावे.तसेच दर दिवशी घेण्यात येणाऱ्या मेळावे यांची माहिती ,मेळाव्याचे चित्रण,सिडी पेनड्राईव्ह द्वारे महिला व बालकल्याण विभागास सादर करावी.
८) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांचा राहील.

Scanned with OKEN Scanner

९) दरपत्रके मुदतीतमध्ये व कार्यालयीन वेळेमध्ये वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील. सदर दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रिक बाबीचा लिफाफा क्र.१ व वित्तीय बाबीचा लिफाफा क्र.२) दि.२९/०७/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

१०) यांसंबधीची दरपत्रके दि. ३०/०७ / २०२४ रोजी दु.३.०० वाजता अथवा इतर सोयीच्या दिवशी उपायुक्त,महिला व बालकल्याण यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित / अनुपस्थित असल्यास दरपत्रक उघडण्यात येतील.

११) दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून ७ दिवसांत करारनामा करणे बंधनकारक राहील.

१२) दरपत्रक बिनशर्त असावे. सशर्त दरपत्रक नाकारण्यात येईल.

१३) वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत, त्यांचे दरपत्रक पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात येईल.

उपायुक्त
महिला व बालकल्याण विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner